पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/४६१/२०२१
दिनांक : ०१/१०/२०२१

प्रति,

मा......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महह्ननगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **दि.०५/१०/२०२१** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची **पाक्षिक** सभा **मंगळवार**, दिनांक **०५/१०/२०२१** रोजी **दु.२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, शहर सुधारणा समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व दि.२८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सभेस आपण ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित रहावे, ही विनंती.

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - १९**

**दिनांक : ०५/१०/२०२१** **वेळ : दुपारी २.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची **पाक्षिक** सभा **मंगळवार,** दिनांक **०५/१०/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, शहर सुधारणा समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व दि.२८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सभेत खालील कामकाज होईल.


----------

अ) मा.शहर सुधारणा समिती सभा (कार्यपत्रिका क्रमांक १८) दि.२८/०९/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस-१८०५।१०५०।प्र.क्र.७९५।०५।नवि-१३, दि. ३०।०५।२००८ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस- १८०८।८९४।सीआर-१७२७।०९।नवि-१३, दि. १८।०८।२००९, व अधिसुचना क्र. टिपीएस- १८१२।१६०।सीआर-५८।१२, पुर्नरचना नं.।२७।१२ ईपी मंजूर/युडी-१३, दि. ०२।०३।२०१५ अन्वये विकास योजना मंजूर आहे. वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे किवळे येथील स.नं. ८, ९, १०, ३६, ३७, ३८, ३९, ४१, ७८ या पैकी मधील मंजूर विकास योजनेतील रावेत हद्द ते देहूरोड कॅन्टोमेंट हद्दीपर्यंत मुंबई – पुणे बाह्यवळण महामार्गा लगतचे १२.०० मी. चे दोन सर्व्हीस रस्त्याने प्रस्तावित आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे किवळे ता. हवेली, जि.पुणे. येथील मंजूर विकास योजने मधील स.नं. ८, ९, १०, ३६, ३७, ३८, ३९, ४१, ७८ या पैकी मधील मंजूर विकास योजनेतील रावेत हद्द ते देहूरोड कॅन्टोमेंट हद्दीपर्यंत मुंबई – पुणे बाह्यवळण महामार्गा लगतचे १२.०० मी.चे दोन सर्व्हीस रस्त्याचा विकास करणे सदर भागातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता वाहतूकीच्या दळणवळणाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर रस्त्याने बाधीत जागा टि.डी.आर./एफ.एस.आय.चे बदल्यात मनपाचे ताब्यात देणेस जागा मालक तयार नाहीत. त्यामुळे सदर रस्त्याच्या जागेचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. त्याकरिता मौजे किवळे येथील वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजने मधील मधील स.नं. ८, ९, १०, ३६, ३७,

३८, ३९, ४१, ७८ या पैकी मधील मंजूर विकास योजनेतील रावेत हद्द ते देहूरोड कॅन्टोमेंट हद्दीपर्यंत मुंबई – पुणे बाह्यवळण महामार्गा लगतचे १२.०० मी.चे दोन सर्व्हीस रस्त्या खालील जमिनीचे भूसंपादन, करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह व भूमी संपादन पुर्नवसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/४६१/२०२१
दिनांक : ०१/१०/२०२१ चे लगत.